नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २१९ | Issue - 219 | वार गुरूवार दि. २६ डिसेंबर २०२४ | Blow- Thursday Date 26 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### दहा लाखांची लाच घेताना वनाधिकारी जाळ्यात

पालघर : लाखो रुपयांच्या लाचेची मागणी केल्याप्रकरणी मांडवी वनक्षेत्रपाल संदीप चौरे यांच्यावर मंगळवारी मांडवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर त्यांच्या मिरा रोड येथील घराची झाडाझडती घेतली असता घरात १ कोटी ३७ लाखांची रोकड आणि ५८ तोळे सोने आढळून आले आहे. तसेच त्यांच्या घरात महागडे फर्निचर आणि वस्तू आढळून आल्या आहेत. तक्रारदार यांच्या मालकीची जमीन वसईतील सासूपाडा येथे असून ती संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनविभागाच्या क्षेत्रात येत असल्याने जागा ताब्यात घेऊन वनविभागाने सील केली होती. हे प्रकरण मांडवी परिक्षेत्राकडे प्रलंबित होते. या प्रकरणात तक्रारदाराच्या बाजूने वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करून ती परत मिळवून देण्याचे आश्वासन मांडवी परिक्षेत्राचे वनक्षेत्रपाल संदीप चौरे याने दिले होते. त्यासाठी २० लाखांची लाच मागितली होती. याबाबत तक्रारदाराने पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती.

# राज्यात २७-२८ डिसेंबरदरम्यान गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज

## शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार नियोजन करावे; कृषी विभागाचे आवाहन

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : २७-२८ डिसेंबरदरम्यान मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

२७ डिसेंबरला दुपारपासून मेघगर्जनेसह पावसाची सुरुवात सर्वात प्रथम नंदुरबार, धुळे, जळगाव, अहिल्यानगर जिल्ह्यांसह, दक्षिण मराठवाडा, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांतील पूर्व भागांमध्ये होईल. शुक्रवार रात्रीपर्यंत वादळी पाऊस पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यात हजेरी लावेल, ज्यात बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या उर्वरित जिल्ह्यांतील काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता देखील आहे.

२८ डिसेंबरच्या पहाटेपर्यंत वादळी पाऊस पूर्वेकडे सरकेल आणि विदर्भातील इतर जिल्ह्यांत हजेरी लावेल. यात यवतमाळ,



वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, आणि चंद्रपूर जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपीट होण्याची शक्यता आहे. पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यातील काही भागांमध्ये पावसाची स्थिती या दिवशी देखील कायम राहण्याची शक्यता आहे. या दिवशी एकंदरीत विदर्भात आणि मराठवाड्यात आभाळी हवामान अपेक्षित असल्यामुळे कमाल तापमानात थोडी घट होईल. मात्र खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात हवामान स्थिर होण्यास सुरुवात होईल.

२९ डिसेंबरला विदर्भ आणि मराठवाड्यातील काही तुरळक ठिकाण वगळता राज्यातील बहुतांश भागांत स्थिर हवामान पहिला मिळेल, आणि ३० डिसेंबरपासून थंडीत वाढ होईल.

शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार नियोजन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. प्राण्यांना आणि काढणी केलेल्या पिकांना पाऊस, गारपीट आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे. वादळ आल्यास झाडांखाली, मोकळ्या जागेत, टिनाच्या शेडखाली, वीजप्रवाह असलेल्या तारांखाली किंवा विद्युत रोहित्रांनजीक आसरा घेऊ नये, असे आवाहन देखील कृषी विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

# सतीश वाघ खून प्रकरण; मारेकऱ्यांना दिली पाच लाखांची सुपारी, पत्नी गजाआड

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



पुणे : भारतीय जनता पक्षाचे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश वाघ यांचा खून पत्नीने घडवून आणल्याची धक्कादायक माहिती तपासात उघड झाली आहे. वाघ यांच्या जाचामुळे पत्नीने मारेकऱ्यांना पाच लाख रुपयांची सुपारी दिल्याचे तपासात उघड झाले. त्यानंतर पोलिसांनी तिला बुधवारी रात्री अटक केली.

याप्रकरणी मोहिनी सतीश वाघ (वय ५३, रा. फुरसुंगी) यांना अटक करण्यात आली. वाघ यांच्या खून प्रकरणात यापूर्वी आतिश जाधव, पवन श्यामकुमार शर्मा (वय ३० रा. शांतीनगर, धुळे ) नवनाथ अर्जुन गुरसाळे (वय ३२ रा. अनुसया पार्क, वाघोली) अक्षय हरीश जावळकर, विकास शिंदे यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अक्षय जावळकर हा सतीश वाघ यांच्याकडे भाडेकरु म्हणून राहत होता. वाघ आणि अक्षय यांच्यात वाद झाले होते. त्यांनी अक्षयला खोली सोडण्यास सांगितले होते. मोहिनी यांच्याशी असलेली जवळीक त्यांना खटकली होती. वाघ यांच्या जाचामुळे पत्नी मोहिनी यांनी अक्षयला पतीचा काटा काढण्यास सांगितले. पतीच्या खूनासाठी त्यांनी पाच लाख रुपयांची सुपारी दिली. त्यानंतर अक्षयने सराइत गुन्हेगार पवन शर्मा याला सुरुवातीला दीड लाख रुपये दिले. वाघ दररोज सकाळी फिरायला जायचे. नऊ डिसेंबर रोजी ते नेहमीप्रमाणे सकाळी बाहेर फिरायला पडले. आरोपी अक्षय, पवन, नवनाथ, विकास, आतिश यांनी वाघ यांचे मोटारीतून अपहरण केले. धावत्या मोटारीत वाघ यांच्यावर आरोपींनी चाकूने ७२ वार केले. त्यांचा मृतदेह शिंदवणे घाटातील ऊरळी कांचन परिसरात टाकून आरोपी पसार झाले. त्यानंतर पोलिसांनी तपास करुन आरोपींना अटक केली.

# वर्षभरात ३५ हजार विद्यार्थी बेकायदा परदेशात; मानवी तस्करीप्रकरणी ईडीचे मुंबई, नागपूरसह आठ ठिकाणी छापे

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : कॅनडा आणि अमेरिकेत जवळपास ३५ हजार विद्यार्थ्यांना बेकायदा पाठवण्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. याप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मानवी तस्करीप्रकरणी मुंबई, नागपूर, गांधीनगर आणि वडोदरा येथील आठ ठिकाणी छापे टाकले असून भावेश अशोकभाई पटेल आणि इतर (डिंगुचा प्रकरण) यांच्या विरोधात सुरू असलेल्या तपासाअंतर्गत हे छापे टाकण्यात आले आहेत. आरोपींनी मुंबई व नागपूरमधील दोन संस्थांमार्फत परदेशी संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून देण्यासाठी करार केल्याचा संशय आहे. या कारवाईत त्यांच्या बँक खात्यातील १९ लाख रुपये गोठवण्यात आले. तसेच दोन मोटरगाड्यांसह संशयित कागदपत्रे व डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आली.

मुंबई आणि नागपूर येथील दोन संस्थांनी परदेशातील विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून देण्यासाठी कमिशनच्या आधारे एका संस्थेशी करार केला आहे. त्यांच्याशी अमेरिकेत कायदेशीररीत्या स्थलांतर करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांना संपर्क साधायचे. छाप्यांमध्ये त्यातील एका संस्थेने दरवर्षी २५ हजार विद्यार्थ्यांना व दुसऱ्या संस्थेने १० हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना परदेशातील महाविद्यालयांमध्ये पाठवले आहे. त्याशिवाय गुजरातमधील सुमारे १७०० दलाल व देशभरातील ३५०० दलाल त्यांच्याशी संबंधित असून त्यातील ८०० जण सक्रिय असल्याची माहिती मिळाली, तसेच कॅनडातील सुमारे ११२ महाविद्यालयांनी एका संस्थेसोबत करार केला आहे, तर १५० हून अधिक दुसऱ्या संस्थेसोबत करार केला आहे. या संस्थांचा या प्रकरणाशी काय सहभाग आहे, याबाबत ईडी तपास करत आहे. १० डिसेंबर व १९ डिसेंबरला ईडीने याप्रकरणी छापे टाकले होते, अशी माहिती ईडीकडून देण्यात आली.

गुजरातमधील एक कुटुंब १९ जानेवारी २०२२ ला कॅनडा-अमेरिका सीमेवर मृतावस्थेत सापडले होते. गुजरातमधील डिंगुचा गावातील त्या चौघांना बेकायदेशीररीत्या अमेरिकेत पाठवण्यात आले होते. याप्रकरणी गुजरात पोलिसांनी अशोकभाई पटेल व इतरांविरोधात गुन्हा दाखल केला होता. त्या गुन्ह्यांच्या आधारे ईडी याप्रकरणी तपास करत आहे. त्यात आरोपींनी अमेरिकेत पाठवण्याचे आमिष दाखवून प्रति व्यक्ती ५५ ते ६० लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले.

अमेरिकेत पाठवण्यासाठी आरोपी दलाल प्रथम कॅनडातील महाविद्यालयांमध्ये अथवा विद्यापीठांत विद्यार्थ्यांच्या नावाने प्रवेश घ्यायचे. त्यानंतर विद्यार्थी व्हिसावर त्यांना कॅनडाला पाठवले जायचे. तेथे पोहोचल्यावर बेकायदा त्या व्यक्तींना अमेरिका-कॅनडा सीमा ओलांडून अमेरिकेत पाठवले जायचे. महाविद्यालयात व विद्यापीठात सहभागी न झाल्यामुळे या विद्यार्थ्यांचे शुल्क परत केले जायचे. अशा प्रकारे ही टोळी काम करत होती. पण संबंधित व्यक्ती बेकायदेशीररीत्या अमेरिकेत पोहोचायचे.

# शेजाऱ्यांचे भांडण पोहचले दिल्लीत, उत्तर प्रदेशच्या तरुणाने संसद भवनासमोर घेतले पेटवून

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिल्लीत आज नव्या संसद भवनाजवळ एक धक्कादायक घटना समोर आली आहे. आज दुपारी एका व्यक्तीने स्वतःला पेटवून घेतले. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान तेथे घटना घडली त्यावेळी उपस्थित असलेल्या नागरिकांसह रेल्वे पोलिसांनी तातडीने आग विझवली. त्यानंतर संसद भवनाच्या सुरक्षा रक्षकांनी जखमी व्यक्तीला राम मनोहर लोहिया रुग्णालयात दाखल केले आहे. यावेळी पोलिसांना घटनास्थळावर अर्धवट जळालेली दोन पानांचे पत्र सापडले आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार पीडिताचे नाव जितेंद्र असे असून, तो उत्तर प्रदेशातील बागपतचा आहे. या पीडित व्यक्तीने रेल्वे भवनाजवळील एका उद्यानात स्वत:ला पेटवून घेतले आणि नंतर संसद भवनाच्या दिशेने तो धावू लागला, असे पोलिसांनी सांगितले. दरम्यान रेल्वे भवन नव्या संसद भवनाच्या इमारतीसमोर आहे.

या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेतील पीडित व्यक्तीचे बागपतमधील एका कुटुंबाशी वाद आहे. या वादामुळे दोन्ही कुटुंबांनी तुरुंगवास भोगला आहे. या घटनेमुळे पीडित जितेंद्र व्यथित होता. त्यामुळे जितेंद्र आज रेल्वेने दिल्लीला आला. त्यानंतर जितेंद्रने रेल्वे भवन परिसरातील उद्यानात अंगावर पेट्रोल ओतून स्वत:ला पेटवून घेतले.

या पीडिताला रुग्णालयात दाखल करेपर्यंत तो गंभीरपणे भाजला होता. त्याच्यावर आता बर्न्स युनिटमध्ये उपचार सुरू आहेत, असे पोलिसांनी पुढे सांगितले.

आज दुपारी ३.३५ च्या सुमारास अग्निशमन दलाला या घटनेबाबत फोनवरून माहिती मिळाली. त्यानंतर अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी रवाना झाले. दरम्यान पोलीस आणि फॉरेन्सिक तपास पथकाने घटनास्थळी पुरावे गोळा केले. घटनेनंतर लगेचच घटनास्थळावरील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यामध्ये पीडित व्यक्तीला काळ्या ब्लँकेटने झाकलेले दिसत आहे.

## हरित ऊर्जेच्या माध्यमातून हरित क्रांती... मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

# विजबिल माफीसोबतच दिवसा विजेचे स्वप्न पूर्ण होणार





**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत वाशिम जिल्ह्यातील उंबर्डा येथील ४ मेगावॅट क्षमतेच्या आणि धाराशिव जिल्ह्यातील नारंगवाडी येथील २ मेगावॅट क्षमतेच्या अशा एकूण ६ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पांचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे झाले.

यावेळी संबंधित विभागाचे सचिव आणि इतर अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी दूरदृश्य प्रणालीद्वारे उंबर्डा आणि नारंगवाडी येथील शेतकर्यांसोबत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी संवाद साधला.

या माध्यमातून सौर ग्राम तयार करण्याचे आणि शेतकर्यांना दिवसा वीज देण्याचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम करत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केले. यामुळे शेतकर्यांना दिवसा शाश्वत वीज उपलब्ध होणार आहे.

शेतकर्यांना एकूण १६०० मेगा वॅट इतकी वीज लागते. हे सर्व फिडर सौर उर्जेवर आणण्यासाठी राज्य शासनाने २ वर्षांपूर्वी कार्यक्रम हाती घेतला होता. यामार्फत टप्प्या-टप्प्याने एक-एक गाव सौर ऊर्जित होते आहे. शेतकर्यांना याआधी दिली जाणारी वीज सरकारला ₹७ प्रती युनिट पडत असून शेतकर्यांकडून यासाठी ₹१.५ आकारले जात असत. त्यामुळे सबसिडीचा बोजा सरकारवर पडत होता. या योजनेमुळे या वीजेसाठी आता केवळ ₹३ लागणार असल्याने मोफत विजेच्या योजनेचा सरकारवर बोजा पडणार नाही. यासोबतच या योजनेला पुढे देखील सातत्याने चालवता येणार आहे.

यावेळी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या मदतीने हरित उर्जेमार्फत शेतकरी आपल्या गावांमध्ये हरित क्रांती आणतील हा विश्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.

# एटीएसकडून १७ बांगलादेशी घुसखोरांना अटक

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबईः दहशतवाद विरोधी पथकाने राज्यभर राबवलेल्या विशेष मोहिमेत १७ बांगलादेशी घुसखोरांना अटक केली. त्यात तीन महिलांचा समावेश आहे. याप्रकरणी ठाणे, नवी मुंबई, मुंबई शहर, नाशिक या ठिकाणी १० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरोपींनी बनावट कादपत्रांद्वारे भारतीय आधारकार्ड व पॅनकार्ड तयार केल्याचे निष्पन्न झाले आहे. दहशतवाद विरोधी पथकाकडून स्थानिक पोलिसांच्या मदतीने महाराष्ट्रात विविध ठिकाणी अवैधरित्या वास्तव्य करणाऱ्या




बांगलादेशी नागरीकांचा शोध घेण्यासाठी आणि त्यांच्यावर करवाई करण्यासाठी विशेष मोहिम राबवण्यात आली आहे. त्याचाच भाग म्हणून ठाणे, नवी मुंबई, मुंबई शहर, नाशिक इ. शहरांमध्ये अवैधरित्या भारतात प्रवेश केलेल्या बांगलादेशी नागरिकांचा शोध घेण्यात आला. त्यात विविध पोलीस ठाण्यांमध्ये आतापर्यंत एकुण १० गुन्हे परकिय नागरिक कायदा १९४६, पारपत्र (भारतात प्रवेश) कायदा १९५०, पारपत्र अधिनियम १९६७ प्रमाणे दाखल करण्यात आले आहेत. त्यात १४ पुरुष व ३ महिला अशा एकूण १७ अवैधरित्या वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे. बांगलादेशी नागरिकांनी बनावट कागदपत्रांचा वापर करून आधारकार्ड, पॅनकार्ड इ. आळखपत्रेही तयार केली असल्याचे या मोहिमेदरम्यान निदर्शनास आले आहे.

## संपादकीय....

### मानवी तस्करी

कॅनडा आणि अमेरिकेत जवळपास ३५ हजार विद्यार्थ्यांना बेकायदा पाठवण्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. याप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मानवी तस्करीप्रकरणी मुंबई, नागपूर, गांधीनगर आणि वडोदरा येथील आठ ठिकाणी छापे टाकले असून भावेश अशोकभाई पटेल आणि इतर (डिंगुचा प्रकरण) यांच्या विरोधात सुरू असलेल्या तपासाअंतर्गत हे छापे टाकण्यात आले आहेत. आरोपींनी मुंबई व नागपूरमधील दोन संस्थांमार्फत परदेशी संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून देण्यासाठी करार केल्याचा संशय आहे. या कारवाईत त्यांच्या बँक खात्यातील १९ लाख रुपये गोठवण्यात आले. तसेच दोन मोटरगाड्यांसह संशयित कागदपत्रे व डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आली. मुंबई आणि नागपूर येथील दोन संस्थांनी परदेशातील विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून देण्यासाठी कमिशनच्या आधारे एका संस्थेशी करार केला आहे. त्यांच्याशी अमेरिकेत कायदेशीररीत्या स्थलांतर करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांना संपर्क साधायचे. छाप्यांमध्ये त्यातील एका संस्थेने दरवर्षी २५ हजार विद्यार्थ्यांना व दुसऱ्या संस्थेने १० हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना परदेशातील महाविद्यालयांमध्ये पाठवले आहे. त्याशिवाय गुजरातमधील सुमारे १७०० दलाल व देशभरातील ३५०० दलाल त्यांच्याशी संबंधित असून त्यातील ८०० जण सक्रिय असल्याची माहिती मिळाली, तसेच कॅनडातील सुमारे ११२ महाविद्यालयांनी एका संस्थेसोबत करार केला आहे, तर १५० हून अधिक दुसऱ्या संस्थेसोबत करार केला आहे. या संस्थांचा या प्रकरणाशी काय सहभाग आहे, याबाबत ईडी तपास करत आहे. १० डिसेंबर व १९ डिसेंबरला ईडीने याप्रकरणी छापे टाकले होते, अशी माहिती ईडीकडून देण्यात आली. गुजरातमधील एक कुटुंब १९ जानेवारी २०२२ ला कॅनडा-अमेरिका सीमेवर मृतावस्थेत सापडले होते.

# सासवड येथे विविध सामाजिक व पक्ष संघटनांचे आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पुरंदर/प्रतिनिधी

पुरंदर : संसदिय अधिवेशन सुरू असताना, भारतीय संविधानाला पंच्याहत्तर वर्ष झाल्याने, लोकसभेत व राज्यसभेत चर्चा सुरू असताना यावर बोलताना देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी , संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबत संताप जनक वक्तव्य केले, ते म्हणाले की, अलिकडे एक फॅशन निघाली आहे, सारखे आंबेडकर आंबेडकर आंबेडकर असा जप केला जात आहे. , इतक्या वेळा जर देवाचे नामस्मरण केले असते तर तुम्हाला ७ वेळा स्वर्ग प्राप्त झालाअसता , देशाचे घटनात्मक पदावर गृहमंत्री म्हणून कार्यरत असलेल्या जबाबदार मंत्र्यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबत आक्षेपार्ह विधान करणे निषेधार्थ आहे. त्यामुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी विविध सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात आली

सासवड येथे बहुजन हक्क परिषद व विविध पक्ष संघटनेच्या वतीने, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबत केलेल्या अवमान कारक वक्तव्याचा जाहीर निषेध करण्यासाठी, तसेच परभणी येथील , संविधान प्रतिकृतीची मोडतोड करणाऱ्यावर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा या मागणीसाठी व शहिद भिमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूला जबाबदार पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना सदर गुन्ह्यात सह आरोपी करुन, शासनाने सोमनाथ सुर्यवंशी यांच्या दोन्ही भावांना शासकीय सेवेत घ्यावे, व बीड जिल्ह्यातील मस्सा जोगा या गावच्या विद्यमान सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या करणाऱ्या सर्व आरोपींना अटक करण्यात यावी सदर गुन्ह्यातील मुळ सुत्रधाराराचा शोध घेऊन त्याच्या मुसक्या आवळण्यात याव्यात यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान सासवड ते प्रशासकीय इमारत पारगाव सासवड रोड सासवड तालुका पुरंदर, जिल्हा पुणे येथे मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते,




मोर्चाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्मा फुले, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली, यावेळी सासवड नगरपरिषदे समोर निषेध सभा घेण्यात आली, यावेळी बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनिलतात्या ,धिवार आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते भिमसैनिक विष्णूदादा भोसले, शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे तालुका प्रमुख अभिजित जगताप , जेष्ठ पत्रकार एम जी. शेलार, सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत लक्ष्मीशंकर कैलास धिवार , यांनी वरील घटनेचा निषेध करुन, शहिद भिमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना सदर गुन्ह्यात सह आरोपी करा, सोमनाथ सुर्यवंशी यांच्या दोन्ही भावांना शासकीय सेवेत घ्यावे अशी मागणी केली, व संविधान प्रतिकृतीची मोडतोड करणाऱ्या व्यक्तींवर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, तसेच मस्सा जोगा या गावच्या सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करणाऱ्या सर्व आरोपींना तात्काळ अटक करुन, सदर गुन्ह्यातील मुळ सुत्रधाराराचा शोध घेऊन त्याच्या मुसक्या आवळल्या जाव्यात अशी मागणी केली, व गृहमंत्री अमित शहा यांच्या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध केला,

त्यानंतर मोर्चा घोषणा देत मुख्य बाजार पेठेतून प्रशासकीय इमारतीकडे गेला , यावेळी प्रांत कार्यालयाचे नायब तहसीलदार विजय चांदगुडे, तहसिलदार कार्यालयाचे निवासी नायब तहसीलदार संदीप पाटील व सासवड पोलीस स्टेशनच्या पोलीस उप निरीक्षक पोटे मॅडम यांना निवेदन देण्यात आले यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पक्षाचे तालुका कार्याध्यक्ष बंडूकाका जगताप, माजी नगरसेवक सोपान रणपिसे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया श्रमिक ब्रिगेड पारधी आघाडीचे पुरुषोत्तम पवार, जेष्ठ नेते आनंदराव घोरपडे गुरुजी , शशीभाऊ गायकवाड, अल्पसंख्याक सेलचे मोमीन बागवान बहुजन सामाजिक विकास प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष सुनिल जगताप, संजीव कांबळे, सादू भोसले पथारी संघटनेचे संचालक गुलाबराव सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते, संभाजी आबा चव्हाण, जेष्ठनेते बदाम आण्णा माकर, सामाजिक कार्यकर्ते , अरुण मोहिते काँग्रेस अनुसूचित जाती जमाती सेलचे तालुका अध्यक्ष अनिल कांबळे, श्रीधर गायकवाड ,सुधीर शेलार, भारतीय बौध्द महासभेचे अनिल मसने सर, शाम जगताप,अभिजित सोनवणे आबासाहेब वाघमारे, संतोष डुबल, ,संदीप भोंडे , सचिन आढाळगे, अजय शिंदे, भरत शिंदे, युवानेते अनिरुध्द दोडके, राजु भोंडे, राजु खवले, संजय सोनवणे, सचिन खरात, यशवंत सोनवणे, सिध्दार्थ यादव, धीरज यादव, तुषार लोंढे, सचिन लोंढे, संदेश सोनवणे, विजय धोत्रे, दत्ता कोकरे, रोहन मोरे, राहुल खवले, सागर बागडे ,कार्तिक बागडे, सौरब कुंभारकर, यश पवार, विलास दोडके, राजेंद्र कसबे, प्रथमेश गायकवाड, शकुन्तला सोनवणे ,ओकांर बहुले, सुमित भोसले , कुणाल भोसले, निलंगी भोसले, यासह विविध मान्यवर उपस्थित होते, सदर मोर्चात बहुजन हक्क परिषद, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेड पारधी आघाडी, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गट, काँग्रेस पक्ष, बहुजन सामाजिक विकास प्रतिष्ठान, यासह विविध पक्ष संघटनेच्या कार्यकर्त्यांनी व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींने सहभाग दर्शविला, कार्यक्रमाचे आयोजन, बहुजन हक्क परिषद व विविध पक्ष संघटनेच्या वतीने करण्यात आले होते,

## माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी यांच्या मदतीसाठी डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशनकडून ५ लक्ष रुपयांची मदत जाहीर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई,(केतन भोज) भारतीय क्रिकेट संघाचा आक्रमक माजी फलंदाज विनोद कांबळी यांना प्रकृतीच्या कारणास्तव ठाणे ( भिवंडी ) येथील आकृती हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करण्यात आले होते.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार त्यांचे ओएसडी मंगेश चिवटे यांनी भेट घेऊन आस्थेवाईकपणे चौकशी केली तसेच आकृती हॉस्पिटलच्या डॉक्टरांशी चर्चा करून विनोद कांबळी यांच्या उपचारात कोणतीही गोष्ट कमी राहणार नाही याची काळजी घ्या अशी विनंती केली.

क्रिकेटपटू विनोद कांबळी यांची सध्याची परिस्थिती पाहता कल्याण लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी कांबळी यांस वैयक्तिक ५ लक्ष रुपयांची मदत करण्याचे जाहीर केले आहे.डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या माध्यमातून ही मदत पूढील आठवड्यात करण्यात येणार असून येणाऱ्या काळात त्यांना अजून मदत करण्याचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी आश्वासन दिल्याचे ओएसडी मंगेश चिवटे यांनी सांगितले. राज्याचे संवेदनशील माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मदतीबद्दल क्रिकेटपटू विनोद कांबळी यांनी कृतज्ञता व्यक्त केली तसेच हॉस्पिटलमध्ये भेटण्याची विनंती केली. लवकरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि संवेदनशील खासदार डॉ.श्रीकांत शिंदे हे क्रिकेटपटू विनोद कांबळी यांची भेट घेऊन कांबळी परिवाराला मदत करणार आहेत.

## दुधनी जि.प.प्राथ.मराठी केंद्र शाळा व कन्नड मुले शाळा यांची संयुक्त शालेय उपक्रमांतर्गत वनभोजन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/प्रतीनीधी) :

अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील जि प म प्रा मराठी केंद्र शाळा व कन्नड मुलांचे शाळेच्या संयुक्तरीत्या वन भोजन कार्यक्रम संपन्न झाली.

दुधनी येथील सुप्रसिध्द व्यापारी तथा प्रगतीशील शेतकरी श्री राजकुमार सोळसे सावकार यांच्या मळ्यात आयोजित करण्यात आले होते. सकाळी अकरा वाजता परिपाठानंतर दोन्ही शाळेतील विद्यार्थी रांगेत शेताकडे रवाना झाले त्यानंतर राजू सोळसे मालक यांनी मुलांसाठी शेतात साफसफाई करून जागा उपलब्ध करून दिली



शेतातील पिके,वृक्ष वनस्पती याबाबत माहिती देण्यात आली. अनेक सांस्कृतिक कार्यक्रम सादर करताना श्री सुभाष अतनूरे सर व महांतेश कर सर यांच्या मधूर वाणीने व मराठी शाळेचे मुख्याध्यापक श्री श्रीशैल मलगण सर यांच्या मुलांसोबत ठुमक्याच्या नृत्येने परिसर दुमदुमून गेला. अनेक मुले नृत्य गायन सादर केले. जेवणाचा आस्वाद घेतला. दिवसभर परिसरात वन भोजन संपन्न झाले. यावेळी कन्नड शाळेचे मुख्याध्यापक श्री दत्तात्रय टोणगे सर, सह शिक्षक श्री सिध्दाराम गोरे, श्री बसवराज मंत्री, संजीवकुमार बेण्णेसूर, रविकुमार कोरचगाव, श्री सुहास पवार सर श्री उड्डा सर सह शिक्षिका शोभा म्हेत्रे मॅडम,चनशेट्टी मॅडम,डोंगराजे मॅडम,अंजली गुंजोटे मॅडम यांचे सहकार्य लाभले.शेवटी श्री पोमू राठोड सर यांनी सर्वांचे आभार मानले.

## महाविद्यालयाने शिष्यवृत्तीचे प्रलंबित अर्ज मंजुरीसाठी तात्काळ सादर करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव/सुधाकर रणदिवे : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा अंतर्गत देण्यात येणाऱ्या भारत सरकार शिष्यवृत्ती शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती राजश्री शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती व व्यावसायिक पाठ्यक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता इत्यादी योजनेचे सण २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील अर्ज भरणे करिता http:/mahadbtmahit.gow.in हे संकेतस्थळ २५ जून २०२४ सुरू केलेले आहे. सन २०२४-२५ करिता महाडीबीटी प्रणालीवर ४५७९ अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी अर्ज भरले आहेत त्यापैकी १४५७ अर्ज हे महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत.

संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अद्याप पर्यंत या अर्जाची पडताळणी करून हे अर्ज सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाकडे सादर केलेले नाहीत. जिल्ह्यातील सर्व प्राचार्यांनी सन २०२४-२५ करिता आपल्या महाविद्यालयाच्या लॉगिन वर प्रलंबित असलेले अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्ती चे पात्र अर्ज मंजुरी करिता तात्काळ सादर करावेत असे आव्हान समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरवत यांनी केले आहे. तसेच या अर्जामध्ये त्रुटी असतील असे अर्ज त्रुटी पूर्तता करूनच समाज कल्याण कार्यालयाकडे मंजुरीसाठी सादर करावेत महाविद्यालयाच्या लॉगिनला एकही अर्ज प्रलंबित राहणार नाही याची दक्षता प्राचार्यांनी घ्यावी मागील वर्षाच्या तुलनेत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे महाडीबीटीवर शिष्यवृत्ती अर्ज नोंदणीचे प्रमाण कमी असून ज्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अद्याप पर्यंत शिष्यवृत्ती अर्ज भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याकरिता महाविद्यालय स्तरावरून सूचित करण्यात यावे असेही कळविण्यात आले आहे.

८१ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न — डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# ज्यांना काम करण्याची आवड आहे त्यांना संधी द्या, आपापसांत भांडणे नकोत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने २२ डिसेंबर २०२४ ला संस्थेचे जनसंपर्क कार्यालय साकेतनगर येथे ८१ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेला उद्घाटनपर मार्गदर्शन करताना राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे फील्ड इन्व्हेस्टिगेटर एड. राजू बागूल म्हणाले की, आयडिया ऑफ जस्टिस मध्ये अमर्त्य सेन यांनी संभाषण, वादविवाद व चर्चेला फार महत्त्व दिले आहे. त्याचा अभाव पहायला मिळत असल्याने जातीजातीतील व उपजातीतील आपापसांतील भांडणे विकोपाला जात आहेत. परिणामी विकास खुंटत चालला आहे. त्यासाठी प्रस्थापित खतपाणी घालत असतात, आरक्षणात उप वर्गीकरण करण्याचा निर्णय हा त्याचाच एक भाग आहे. करिता षड्यंत्रपूर्वक गुणवत्ताहीन शिक्षण देऊन बहुजनांना शिक्षणापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले जात आहे. जागतिक मानांकनात भारतीय विद्यापीठे १०० च्या आत नाहीत तर कुपोषणाच्या मानांकनात सुद्धा १२५ च्या आत नाहीत. यावरून आपल्या समाजाच्या सामाजिक स्वास्थ्याची गंभीर स्थिती लक्षात येते.

याप्रसंगी इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, आपली विचारधारा पुढे घेऊन जाण्यासाठी आपली झोपडी शाबूत ठेवून समझौता केला पाहिजे. प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, नौकरीच्या संधी कमी होत चालल्याने बेरोजगारीचे प्रमाण वाढत चालले आहे. प्रतीक पंचशील म्हणाले की, वर्धा येथे सुरू असलेल्या नालंदा अकॅडमी प्रमाणे सामाजिक शिक्षणाची पुनर्रचना केली पाहिजे. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, लोकशाहीच्या संवर्धनासाठी इंग्लंड, अमेरिकेप्रमाणे विरोधी पक्ष सक्षम असावा लागतो. गोविंद कांबळे म्हणाले की, बदलत्या काळानुसार आपणसुद्धा बदल केला पाहिजे. विलास कट्यारे म्हणाले की, समस्यावर उपाय योजना शोधण्यासाठी वैशालीतील वज्जीगणाप्रमाणे बैठका तर झाल्याच पाहिजेत. महादेव डांबरे म्हणाले की, पॉलिसी मेकर्स होण्यासाठी आपण संघटीत होऊन लढा दिला पाहिजे. अशोक मेश्राम म्हणाले की, लोकांना जोडणे हे आपले कार्य आहे, ते आपण पार पाडले पाहिजे. टी. एन. थोरात म्हणाले की, भारताचे संविधानानुसार समाज निर्माण केला पाहिजे.




प्रमुख वक्ते भारतीय दलित पँथरचे राज्य अध्यक्ष रमेशभाई खंडागळे म्हणाले की, सर्वांनी व्यक्त केलेले विचार संघर्षासाठी उपयोगात आणू शकलो तर आपण यशस्वी होऊ शकतो. दगड फोडणाऱ्या कुटुंबातील सोमनाथ सूर्यवंशी सारखा विद्यार्थी वकील झाला असता तर त्यांनी क्रांतीला हातभार लावला असता. मात्र व्यवस्थेने त्याला संपवून टाकले आहे. त्याच धक्क्यातून विजय वाकोडे सारखे नेतृत्व गमवावे लागले आहे. दादासाहेब गायकवाड हे आमिशाला बळी पडल्याने चळवळीची हानी झाली. रामदास आठवले सारख्या नेतृत्वातून पँथर लोप पावल्याने चळवळ लोप पावत चालली आहे. लंकेश्वर गुरुजी पासून तर पंडागळे साहेबांपर्यंत तीन पिढ्या गारद झाल्या आहेत. मात्र नेतृत्वाला शहाणपण येत नाही. ज्याला जसा रस आहे, त्याला तसे कार्य करू द्यावे, जेणेकरून बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे आपापसांतील भांडणे टाळता येतील.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, समाजजीवनात संघटना अनेक पहायला मिळत असल्या तरी संघटन नाममात्र उरलेले असल्याने त्यांच्या लढ्याला बळ प्राप्त होत नाही. म्हणून संघटीत होण्यासाठी संघर्ष केला पाहिजे. जेणेकरून संघटितपणे आपल्या हक्क अधिकारासाठी लढा देता येईल. करिता लोकशाहीच्या अंमलबजावणीसाठी आपणांस लोकशाहीच्या सर्व अटी व शर्तीचे पालन करावे लागेल जेणेकरून इतरांना तसे करण्यास अपील करता येईल. आपण प्रतिक्रियावादी होण्यापेक्षा क्रियावादी राहून आपले संघटनात्मक कर्तव्य पार पाडले पाहिजे. विधायिका, कार्यपालिका, न्यायपालिका व मेडिया सह जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्राबल्य निर्माण करण्यासाठी प्रशिक्षित मानवीय संसाधनांची फौज तयार व्हावी म्हणून प्रशिक्षण केंद्रे चालविली पाहिजेत. याची सुरूवात आम्ही केली आहे. आपणही आपापल्या परिसरात तशी सुरूवात करावी. गरज भासेल तिथे आम्ही सहकार्य करू जेणेकरून परस्पर सहकार्याने पुढे जाता येईल. फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या कार्याची वाढता व्याप आणि मागणी लक्षात घेऊन आपणही या कार्यात सहभागी व्हावे. विलास कट्यारे यांनी स्वत:हून जबाबदारी स्वीकारायचे जाहीर केले त्याबद्दल त्यांचे स्वागत आहे.

आपण व्हिजन : २०५६ ची दूरदृष्टी लक्षात ठेवून जीवनाच्या सर्व क्षेत्रात पुढे जाण्यासाठी जोमाने कामाला सुरुवात केली पाहिजे. या कार्याच्या यशस्वीतेसाठी ज्यांना ज्या प्रकारचे कार्य करता येईल त्यांना त्या प्रकारच्या कार्याची जबाबदारी सोपविण्यात आली पाहिजे. परिणामी आपापसांतील भांडणे संपुष्टात आणता येतील. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २२ डिसेंबर १९५२ ला पुण्यातील डिस्ट्रीक्ट लॉ लायब्ररीत दिलेल्या संदेशाप्रमाणे लोकशाहीच्या पूर्वावर्ती शर्थी पूर्ण करण्यासाठी आपण कार्यप्रवण होऊया जेणेकरून संसदीय लोकशाहीचे आपणास संवर्धन करता येईल. तसेच २२ डिसेंबर १९४८ ला आर. एम. भट हायस्कूल येथे म्हटल्याप्रमाणे ज्यांना काम करण्याची आवड आहे त्यांना संधी द्या, आपापसांत भांडणे नकोत. या दोन्ही विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त आपण कार्यशाळा आयोजित करून वर्तमान परिप्रेक्ष्यातून चर्चा करीत आहोत.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक एड. विलास रामटेके व सुत्रसंचालन महादेव डांबरे यांनी केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, थोरात टी. एन., प्रा. शिवम गायकवाड, प्रतीक पंचशील, उद्योजक मिलिंद बागूल, महादेव डांबरे, गोविंद कांबळे, विराज गोविंद कांबळे, विलास कट्यारे, अशोक मेश्राम, अरुण इंगळे, एड. रमेशभाई खंडागळे, एड. राजू बागूल, निलेश पट्टेकर, प्रवीण जमदाडे, राजू केदारे, विजय साळवे, दिगंबर गायकवाड, गोविंद कांबळे, एड. डी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे महादेव डांबरे यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# देगांव कालवा व उजनीचे पाणी तालुक्यातील तलावात सोडण्यात यावे : आनंद बुक्कानुरे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/प्रतिनिधी

गेल्या काही वर्षापासुन देगांव कालव्याचे काम रखडले होते.आता मात्र त्या कामाला सुरवात होत आहे. देगांव कालव्याचे काम पुर्ण झाल्यास शेताच्या बंधाऱ्यावर पाणी सोडले जाणार आहे.त्याचप्रमाणे जेऊर, मंगरूळ व नागणसुर जिल्हा परिषद गटातील सव छोटे-मोठे तलाव देगाव कालव्याच्या पाण्याने भरून घेण्यासाठी प्रशासनानी सूक्ष्म नियोजन करावे. या आशेचे पत्र तहसीलदार यांच्याकडे शिवसेना तालुकाप्रमुख आनंद बुक्कानुरे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आला आहे.

स्वातंत्र्यापासून अक्कलकोट तालुका हा दुष्काळी भाग म्हणून आ-ेळखला जातो.एक वर्ष पाऊस पडतो. तर दोन-चार वर्ष म्हणावा तसा पाऊस पडत नाही. त्यामुळे येथील शेतकरी अनेक संघटना तोंड देत आहे यापुढे तरी शेतकऱ्यांचा नियोजन व्हायला पाहिजे. देगाव एक्सप्रेस कालव्यातुन येणाऱ्या पाण्यांचा नियोजन शासन व प्रशासनाने करण्याची गरज आहे.

नागणसूर जिल्हा परिषदमधील नागणसूर, नाविंदगी, गौड़गांव, कडबगांव, उडगी, गळोरगी, तोळणूर, हैद्रा, गुरववाडी, मराठवाडी, बासलेगांव या परिसरात असलेल्या छोटे मोठे तलाव पाण्याने भरून घ्यावा. हे हे शक्य झाल्यास शेतक्यांचा मार्ग सुखकर होणार आहे.

कर्नाटक राज्याकडे जाणाऱ्या भिमानदीचे पाणी हिळ्ळी, खाना-पूर, आळगी येथे अडविण्यात यावे आणि या ठिकाणी बॅरेज बांधून पंप हाऊस लिप्ट करुन त्या पंप हाऊसद्वारे भीमा नदीचे पाणी अक्कलकोटच्या दक्षिण भागातील तलावात सोडण्यात यावे.तसेच कुरनूर धरणात सोडण्यात येणाऱ्या उजनी धरणाचे पाणी चपळ-गाव, सलगर, वागदरी, मैदर्गी, दुधनी अक्कलकोट शहर परिसरातील तल-ावात पाणी सोडण्यात यावे.ते भरून घ्यावे.हे शक्य झाल्यास तालुक्यातील शेतकऱ्यांची प्रगती होण्यास मदत मि ळेल.या सर्व मागणीचा गांर्भीयपुर्वक विचार करुन या सर्व शेतकच्यांच्या मागण्यावर येत्या ५जानेवारी पर्यत सकारात्मक तोडगा निघावा.तसे न झाल्यास शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने संबधित सर्व पीडीत शेतकन्यांना सोबत घेऊन जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ जिल्हाप्रमुख अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विधानसभा संपर्कप्रमुख उमेश सारंग यांच्या सूचनेनुसार तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. याची दखल प्रशासनाने घ्यावी असे शिवसे-नेचे तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी निवेदनात म्हटले आहे. यावेळी विधानसभा संघटक शरण सुरवसे उपतालुकाप्रमुख शांतवीर कळसगुंडा शाखाप्रमुख मल्लिनाथ कल्याण स्वामीनाथ प्रचंडे नितीन मोरे कांतु दरगुंडा सह शिवसैनिक व नागणसूर भागातील ग्रामस्थ उपस्थित होते

## थोडक्यात...

### दहा लाखासाठी विवाहितेचा छळ

सोलापूर : माहेरून दहा लाख रुपये आणून दे म्हणत विवाहितेला वारंवार मानसिक व शारीरिक छळ केल्याची घटना २२ मार्च २०१९ ते २२ ऑक्टोबर २०२४ पर्यंत विवाहितेच्या सासरी घडली. याप्रकरणी सायली प्रीतम वाडेकर (वय-३४,रा.स्वामी विवेकानंद नगर,हत्तुरे वस्ती,होटगी रोड) यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पती प्रीतम अनिल वाडेकर,सासू सरला अनिल वाडेकर,सासरे अनिल शांताराम वाडेकर (सर्व.




रा.आंबोली,पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की,फिर्यादी या सासरी नांदताना वरील संशयित आरोपींनी फिर्यादीस वारंवार घालून पाडून बोलून अश्लील भाषेत शिवीगाळ करणे,तू आमच्या लायकीची नाही,तुझी आम्हाला गरज नाही,आमची मुलगी ठेव व तुझ्या आईकडे जा असे म्हणायचे व आम्ही राहतो येथे आमची तुझ्यामुळे बदनामी झाली आहे.त्यामुळे आम्ही दुसरीकडे घर घेणार आहोत,आम्हाला तुझ्या आईकडून दहा लाख रुपये आणून दे,असे म्हणत शारीरिक व मानसिक छळ केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

### मागील भांडणाच्या रागातून मारहाण

सोलापूर : मागील भांडणाच्या रागातून मारहाण केल्याची घटना सहा डिसेंबरला सायंकाळी सव्वा पाच वाजण्याच्या सुमारास झी हॉटेल समोरील लब्बैक कट्टा येथे घडली. याप्रकरणी जुनेद आब्बास तांबोळी (वय-४३,रा.१०/५६ भवानी पेठ,घोंगडे वस्ती) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

त्यांच्या फिर्यादीवरून सद्दाम नालवार,जैनोद्दीन नालवार, फयाज कोसगीकर, मेहबूब कोसगीकर (सर्व रा.भवानी पेठ,घोंगडे वस्ती) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की,फिर्यादी व फिर्यादीचा भाचा अझरोद्दीन हे घोंगडी वस्ती येथील मस्जिदमध्ये नमाज पठण करून येत होते. झी हॉटेल समोरील लब्बैक कट्टा येथे आले असता संशयित आरोपींनी मागील भांडणाचा राग मनात धरून फिर्यादीस फरशीच्या तुकड्याने डाव्या हातास करंगुळीस दुखापत केली.अझरोद्दीन यांच्या उजव्या हातावर फरशीने व लाथाबुक्क्याने मारहाण करीत शिवीगाळ केल्याचे फिर्यादित म्हटले आहे.

# अंढेरा मंडळातील तात्काळ पाण्याचा प्रश्न आणि इतर शेतकरी हिताचे प्रश्न युद्धपातळीवर



**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**
राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : आजच्या आढावा नियोजन बैठकीत जिल्हा अधिकारी जलसंधारण कार्यकारी अभियंता पाटबंधारे बुलढाणा कार्यकारी अभियंता संत चोखामेळा सागर, एसडीओ सिंदखेड राजा तहसीलदार दे राजा यांनी माननीय जिल्हाधिकारी साहेब यांच्या सोबत तात्काळ पुढील हफ्त्यात बैठक लावून हा अंढेरा मंडळ पंचक्रोशीचां तात्काळ पाण्याचा प्रश्न आणि इतर शेतकरी हिताचे प्रश्न उद्धपातळीवर ध्येय धोरणे आखत निर्णय घेत मार्गी लावत लगेच अंमलबजावणी करणार असे ठरले.

उपोषण कर्ते महारष्ट्र शासन पुरस्कृत सन्मानित युवा शेतकरी श्री कैलास अर्जुनराव नागरे यांच्या प्रमुख तीन शेतकरी हिताच्या मागण्या वरिष्ठ स्तरावरून ध्येयधोरणे आखत मान्य करून तात्काळ अंम लबजावणी करणार

**कैलास नागरे यांच्या उपोषणाची दखल; जलसंधारण विभागाचा हिरवा कंदील**

१) शिवणी आरमाळ येथील लघुप्रकलपाचे नाम करण तेथील दैवत श्री आनंद स्वामी महाराज ब दर्जा प्राप्त संस्थान यावरून आनंद स्वामी लघुप्रकल्प असे करणार

२) शिवणी आरमाळ लघुप्रकलपाचे पीचींग दुरस्ती आणि ३० वर्ष आयुष्याचे झाडा झुडपाचे निर्मूलन तात्काळ इमरजन्सी २ कोतून११ लाख निधी उपलब्ध करून लगेच कामाला सुरवात करण्यात येईल.

३) सर्वात महत्वाचे ज्या उपसा टप्प्यावरून अंढेरा मंडळातील लघुप्रकल्प तुडुंब भरण्यात येईल अश्या ठिकाणचा उद्यापासून तात्काळ स्थळ निरीक्षण करून आरखाडा तयार करून त्याला लागणारा निधी अध-ोरेखित करत उपलब्ध करून घेण्यात येईल आणि सबंधित परवानग्या वरिष्ठ स्तरावरून घेण्यात येईल.असे ठरले

आज दिनांक २४/१२/२०२४ रोजी एसडीओ सिंदखेडराजा आयोजित बैठीकाला जिल्हा जलसंधारण अधिकारी बुलढाणा, कार्यकारी अभियंता, पाठबंधरे विभाग बुलढाणा, कार्यकारी अभियंता संत चोखामेळा सागर, उपविभागीय अधिकारी जलसंधारण दे राजा, तहसीलदार देऊळगाव राजा, ठाणेदार साहेब अंढेरा आदी सबंधित विभागाचे अधिकारी आणि पंचक्रोशी जलमय करण्यासाठी उपोषण कर्ते महाराष्ट्र शासन पुरस्कृत सन्मानित युवा शेतकरी श्री कैलास अर्जुनराव नागरे,सरपंच पती रामदास आंबिलकर अंढेरा,श्री इंदर मुंढे धोत्रा नंदाई, श्री अनिल सोंनपसारे शिवणी आरमाळ, श्री शंकर नागरे बायगाव, श्री. भगवान कायंदे मेंडगाव, श्री संजय मोरे सा-वखेड नागरे,श्री शिवांनाद शिंदे पाडली शिंदे, श्री. सुरेश गीते नागनगाव, सुरा आदी सरपंच प्रतिनिधी आणि सहकारी शेतकरी संजय आरमाल राम प्रसाद पाऱ्हाड, गणेश आंधळे, संतोष सोनपसारे उपस्थित होते तसेच कॉंग्रेस तालुका अध्यक्ष प्रा.दिलीप सानप सर, नझिम भाई देऊळगाव माही,शरद भाऊ खरात रिपाई सरंबा आदी नेते सुद्धा उपस्थित होते व अनेक पत्रकार बंधू सुद्धा उपस्थित होते.

# कामगार महासंघाचे आळंदीत अधिवेशन संपन्न




**दै. यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
उमरगा/प्रतिनिधी

महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे दहावे त्रैवार्षिक अधिवेशन आळंदी येथील फ्रूटवाला धर्मशाळेतील सभागृहामध्ये शुक्रवार२० डिसें ते रविवार ता.२२ डिसेंबर दरम्यान संपन्न झाले.

या अधिवेशनाचे उद्घाटन अखिल भारतीय विद्युत मजदूर महासंघाचे अध्यक्ष मधुसूदन जोशी,यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी महासंघाचे अध्यक्ष विठ्ठल भालेराव,भारतीय म जदूर संघ पश्चिम क्षेत्र प्रभारी सी. व्ही. राजेश,प्रदेशाध्यक्ष अनिल दुमने,

महामंत्री किरण मीलगिर, महामंत्री किशोरीलाल रायकवार, महामंत्री अरूण पिवळ, उप महामंत्री प्रशांत भांबुर्डेकर, संघटनमंत्री विजय हिंगमि रे, वरिष्ठ पदाधिकारी सुभाष सावजी यांची उपस्थिती होती. यावेळी या अधिवेशनात ऊर्जा क्षेत्राचे वाढते खासगीकरण, कंत्राटी भरती, सौर ऊर्जा, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे झालेले त्रिभाजन आदी विषयांवर चर्चा व ठराव घेण्यात आले तसेच, संघटनात्मक कार्यक्रम आणि आगामी तीन वर्षांसाठी नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली .

अधिवेशनात तीन दिवसांत एकूण पाच सत्रात वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

संजय कुलकर्णी, डॉ.रवींद्र उटगीकर,शंतनु दिक्षित यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

त्यानंतर आण्णाजी देसाई निवडणूक अधिकारी यांचे नेमणूक झाल्यावर त्यांचे अधिपत्याखाली तीनही कंपनीतील पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाली,महावितरण केंद्रीय कार्यकारणीत लातूर परिमंडलातून सुधाकर माने यांची निवड संघटनमंत्री पदी झाल्याबद्दल लातूर झोनमधील सर्व पदाधिकाऱ्यांसह सभासदात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. लातूर झोन मधील अधिवेशन ला जाण्यासाठी झोनसचिव प्रवीण रत्नपारखी, उपाध्यक्ष नवनाथ बडे यांनी नियोजन केले, या अधिवेशनात लातूर झोनमधील अध्यक्ष बी.टी चव्हाण,विकास गाडेकर,निलेश भिरंगे,अमोल पाटील, शाम आबाचणे, मोहन सूर्यवंशी, सातय्या स्वामी,मोहन गुरव, अनिल कोल्हे, वाय. यु, चव्हाण, राजकुमार पाटील, बालाजी जाधव,सुंदर आजणवतीकर, सुजाता हेंगणे, अनुराधा शिंदे,मोहम्मद लदाफ, यांच्या सह पदाधिकारी उप-स्थित होते.

महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे अध्यक्ष विठ्ठलजी भालेराव यांचे अध्यक्षीय भाषण झाले व श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पसायदानाने महाअधिवेशनाचा समारोप झाला. महाराष्ट्रभरातून मुंबई, पुणे, औरंगाबाद,नांदेड, लातूर,धाराशिव, उमरगा अशा परिमंडळातून विविध पदाधिकारी, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुधनी येथिल एस जी परमशेट्टी प्रशालेत क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन

**दै. यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
दुधनी/प्रतिनीधी : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील श्री एस जी परमशेट्टी प्रशालेत क्रीडा सप्ताहाचे शानदार उद्घाटन गायत्री क्लासेस सोलापूर संस्थापक अध्यक्ष अंबिका पाटील यांच्या हस्ते क्रीडा ध्वजारोहण करून उद्घाटन करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी दुधनीचे माजी नगरसेवक प्रसिद्ध अडत व्यापारी गुरशांतप्पा परमशेट्टी हे होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजशेखर पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले तदनंतर माजी नगरसेवक सिद्धाराम एकदि यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलन करण्यात आले कबड्डी मैदानाची पूजा राष्ट्रीय खेळाडू रविदास राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. त्याच्यानंतर आंतरशालेय क्रीडा स्पर्धेचे प्रास्ताविक भाषण प्रशालेचे क्रीडा प्रमुख दत्तात्रय हिळ्ळी यांनी केले . सर्व मान्यवरांचा सत्कार व तालुका व जिल्हास्तरीय उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचे सत्कार करण्यात आले श्रावणी अच-लेरे हिच्या नेतृत्वाखाली क्रीडा ज्योतीची परिक्रमा करण्यात आले.



यावेळी उद्घाटक अंबिका पाटील हिने आपल्या भाषणात मी परमशेट्टी शाळेतील शिक्षकांच्या मुळेच मी उंच शिखर गाठू शकले सर्व विद्यार्थ्यांनी देखील कठोर परिश्रम करून खेळाबरोबर बौद्धिक ज्ञान ही संपादन करा असे सल्ला दिले राष्ट्रीय खेळाडू रविदास राठोड यांनी आपल्या मनोगतात माझं करिअर घडवण्यात परमशेट्टी शाळेतील शिक्षकांचा सिंहाचा वाटा आहे असे सांगून शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त केली मुख्याध्यापक रेवणसिद्ध आलीगावे यावेळी मनोगत व्यक्त केले.

आंतर शालेय क्रीडा स्पर्धेत खो-खो कबड्डी क्रिकेट लिंबू चमचा गोणपाट उडी स्लो सायकल शंभर मीटर धावणे ४०० मीटर धावणे फोर इंटू हंड्रेड रिले असे विविध खेळांचे समायोजन या आंतरशालेय क्रीडा स्पर्धेत करण्यात आले आहे पंच म्हणून अविनाश भैरूणगी राजशेकर पाटील महालिंग सोमेश्वर सुरेश बिराजदार खाजपा शिंगे सातलिंग गुळगोंडा गिरीष गाडी चंद्रशेखर खंडाळ रामलिंग मंजुळकर मलया स्वामी यांनी पंच म्हणून काम केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेचे पर्यवेक्षक लक्ष्मीपुत्र गद्दी नागदेवी स्वामी प्रियांका पावली लक्ष्मी म्हेत्रे श्रुती दिवटे महादेवी कोरे अर्चना परमशेट्टी पार्वती हिरेमठ परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागराज कलबुर्गी यांनी केले मान्यवरांचे आभार दत्तात्रय हिळ्ळी यांनी मानले.

**मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा निर्णय**

**नियमबाह्य बदल्यांच्या चौकशीसाठी त्रिस्तरीय समिती**

# पारदर्शक व निष्पक्षपाती चौकशीसाठी पदभार काढून घ्या : महांतेश्वर कट्टीमनी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
सोलापूर/प्रतिनिधी : पुणे विभागीय आयुक्तांच्या अधिकाराचा गैरवापर करत अक्कलकोट तालुक्यात मोठ्या प्रमाणात नियमबाह्य प्रतिनियुक्त्या केल्याची तक्रार म ागासवर्गीय संघटना आणि सोल-ापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने करण्यात आलेली होती.नियमबाह्य प्रतिनियुक्त्या रद्द करत वादग्रस्त प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आ-लेली होती.सदर तक्रारारीची दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी नियमबाह्य बदल्यांच्या चौकशीसाठी त्रिस्तरीय समिती स्थापन केली असल्याची माहिती मागासवर्गीय संघटनेचे तालुकाध्यक्ष महांतेश्वर कट्टीमनी यांनी दिली.

तक्राराराीचे स्वरूप आणि गांभीर्य पाहता प्रभारी गटशिक्षणाधिकारी हे आपल्या हाताखा-लील कर्मचाऱ्यांवर दबाब आणून पारदर्शक आणि निष्पक्षपाती चौकशीसाठी अडथळा ठरू शकतात. पारदर्शक आणि निष्पक्षप-ाती चौकशीसाठी वादग्रस्त प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांचा पदभार तातडीने काढून घेऊन चौकशी करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आलेली आहे. पदभार न काढता चौकशी करणे हा केवळ चौकशीचा फार्स ठरणार असल्याचे भीती संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

**चौकशी समितीची व्याप्ती वाढवा**

**सातत्याने प्राप्त गंभीर स्वरूपाच्या तक्रारींमुळे चौकशी समितीची व्याप्ती वाढवून अन्यही गंभीर विषयांचा समावेश करण्याची मागणी यावेळी करण्यात आलेली आहे.तसेच दारिद्र्यरेषेखालील मागासव-र्गीय मुलींचा भत्ता वाटप न करणे,अपात्र शाळेवर पात्र मुख्याध्यापक यांचे वेतन काढून काढणे,नियमबाह्य समायोजन,समाज माध्यमांत शिक्षकांची प्रतिमा मलिन करणे,समानीकरण धोरणाची पायमल्ली,नियमबाह्य प्रभारी केंद्रप्रमुख नियुक्ती या व अन्य गंभीर तक्रारी पाहता केवळ अनियमित बदल्यांची चौकशी हे हिम नगाचे टोक असणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष महांतेश्वर कट्टीमनी यांनी दिली.**

**त्रिस्तरीय समिती सदस्य यांचा समावेश**

सुलभा वठारे-शिक्षणाधिकारी योजना-अध्यक्ष

रुपाली भावसार-उपशिक्षणाधिकारी-सदस्य

हरीष राऊत-विस्तार अधिकारी-सदस्य

गट शिक्षण अधिकारी यांनी २१ नियमबाह्य बदल्या केल्या आ-हेत तसेच बदल्यांचा आदेश देताना गटविकास अधिकारी यांच्याकडे टिपणी ठेवून बदल्या केले आहे. बदल्या रद्द करताना गटविकास अधिकारी यांना अंधारात ठेवून बदल्या रद्द केले आहे. चौकशी करताना यांचा पदभार काढन्याची मागणी निवेदना द्वारे सिईओ संदीप कोहिनकर यांच्याकडे केली आहे.



## थोडक्यात...




### बहिणीची छेड काढल्यावरून जीवे मारण्याचा प्रयत्न

सोलापूर (प्रतिनिधी) बहिणीची छेड काढली काढल्यावरून एकास मारहाण करत जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना २४ डिसेंबर रोजी रात्री साडेसात वाजण्याच्या दरम्यान कल्याण नगर भाग ३ येथे घडली.याप्रकरणी विमल प्रकाश माने (वय-४०,रा.गोकुळ नगर,बालाजी मंगल कार्यालयाजवळ जुळे सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून श्रावण साळुंके (रा.कल्याण नगर भाग ३) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांचा मुलगा प्रभाकर हा बालाजी वाघे यांच्या आसरा चौक येथील दुकानात कामावर हजर असताना वरील संशयित आरोपी याने फिर्यादी जवळ येऊन फिर्यादीने संशयित आरोपीच्या बहिणीची छेड काढली.या कारणावरून आईची व बहिणीची माफी मागायला चल असे बोलून कल्याण नगर भाग ३ येथील झेंडा कट्ट्याजवळ सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास आले. त्यावेळी त्यांच्यात भांडण होऊन संशयित आरोपी याने फिर्यादी यांचा मुलगा प्रभाकर याला हातावर,छातीवर व पोटावर चाकूने वार करून गंभीर दुखापत करत जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास सहाय्य पोलीस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

# मृत संतोष देशमुख यांच्या कुटुंबास अखिल भारतीय सरपंच परिषद घर बांधून देणार

## अखिल भारतीय सरपंच परिषदेची दखल; शासनाची देशमुख कुटुंबीयांना आर्थिक मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

राज्यभरात खळबळ माजवणारी घटना म्हणून मस्साजोग जिल्हा बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांची अपहरण करून त्यांची अमानवीय पध्दतीने निर्घृणरित्या हत्या करण्यात आली. सरपंच,उपसरपंच, सदस्य यांच्या न्याय हक्कासाठी लढणारी अखिल भारतीय सरपंच परिषदचे शिष्टमंडळ या घटने संदर्भात नागपूर येथील हिवाळी अधिवेशना दरम्यान १९ डिसेंबर रोजी परिषदेचे अध्यक्ष जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली विधान भवन नागपूर येथे जाऊन मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री यांची भेट घेतली. मृतक सरपंच देशमुख यांची निर्घृणपणे हत्या झाल्याचे सांगून सरपंच हा गावगाड्यातील प्रमुख घटक असल्याने त्याची जर अशा पद्धतीने हत्या होत असेल तर त्यासाठी सरपंच संरक्षण कायदा करण्यात यावा, मृतकाच्या परिवाराला आर्थिक मदत, शासकीय नोकरी व स्व. सरपंच संतोष देशमुख यांचे स्मारक त्यांच्या गावी उभं करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली होती.या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दहा लाखाची आर्थिक मदत शासनाच्या वतीने विधानसभेत जाहीर केली तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तेवढीच मदत उद्योग मंत्री उदय सामंत, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते सोमवार २३ डिसेंबर रोजी मृतकाच्या मस्साजोग या गावी जाऊन अखिल भारतीय सरपंच संघटनेच्या उपस्थितीत त्यांच्या परिवाराला देण्यात आली .





मृत सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी व आईला भेटताना सरपंच परिषदेचे अध्यक्ष जयंत पाटील व इतर तर दुसऱ्या छायाचित्रात मृत सरपंच संतोष देशमुख यांना श्रद्धांजली वाहताना उद्योग मंत्री उदय सामंत

मस्साजोग या गावी सरपंच परिषदेच्या वतीने सोमवारी राज्यातील सरपंच उपसरपंच यांच्या शिष्टमंडळाने जाऊन त्यांच्या परिवाराची भेट घेऊन त्यांना सांत्वन करून त्यांना धीर दिला. यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत व सामाजिक मंत्री संजय शिरसाठ यांनी मृतक देशमुख यांच्या परिवाराची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी सरपंच परिषदेचे जयंत पाटील म्हणाले की छत्रपती संभाजी महाराजा नंतर एव्हडया क्रूरपणे हत्या ही सरपंच संतोष देशमुख यांची करण्यात आलेली आहे . यामुळे या गुन्ह्यातील सर्व आरोपीला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे .

> **सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर ला निर्घृण हत्या झाल्याच्या निषेधार्थ त्यांना राज्यातील सर्व २८ हजार ग्रामपंचायत च्या वतीने श्रद्धांजली वाहण्यासाठी येत्या ९ जानेवारी रोजी राज्यातील सर्व ग्रामपंचायती च्या वतीने एक दिवस बंद ठेवण्यात येणार आहेत .**
>
> **– जयंत पाटील**
>
> **(अध्यक्ष अखिल भारतीय सरपंच परिषद)**

पंधरा वर्षे सरपंच असूनही देशमुख यांना स्वतःचे राहण्यासाठी घरही नव्हते, मामाच्या जुन्या वाड्यात राहत होते पावसाळ्यात घरात पाणी यायच यामुळे अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या वतीने संतोष देशमुख यांच्या परिवाराला घर बांधून देण्याची घोषणा सरपंच परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष जयंत पाटील यांनी केली . त्यास अखिल भारतीय सरपंच परिषद यांनी घर बांधकामांसाठी १० हजार रुपयाचा चेक देऊन सुरुवात केली.

यावेळी मंत्री उदय सामंत यांनी झालेल्या प्रकाराची निंदा केली तसेच अपराधी कोणीही असो त्यांची गय केली जाणार नाही अशी ग्वाही दिली या आरोपींना मोकका अंतर्गत कारवाई केली जाईल, एसआयटी बरोबर न्यायालयीन चौकशी होईल असे मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत जाहीर केल्याची आठवण करून दिली.

यावेळी अखिल भारतीय सरपंच परिषदेचे बुलडाणा जिल्हाध्यक्ष, अनिल फपाळे ,जळगावचे जिल्हाध्यक्ष रुपेश गांधी, चिखली तालुका अध्यक्ष, सतीश पाटील भुतेकर, बुलढाणा तालुका अध्यक्ष दादा लवकर, अजय गायकवाड, सरपंच श्याम सावळे,, रामभाऊ जाधव, प्रदीप सोळंकी, रमेश अवचार, नागेश उबरहंडे, भिकनराव भुतेकर, संजय पाटील व सरपंच, संदीप ठाकूर गडचिरोली रामराव पाटील बोधवड जळगाव तसेच योगेश बोबडे सरपंच टेंभुर्णी, सचिन जगताप सोलापूर जिल्हाध्यक्ष संभाजी ब्रिगेड उपाध्यक्ष बालाजी जगताप, सुहासदादा टोणपे प्रवक्ते, बापूसाहेब भोसले कुर्डू मा. सरपंच,बाळासाहेब ढेकणे यासह अनेक जिल्ह्यातील सरपंच उपस्थित होते.

# रिफलेक्टर बसवा आपघात टाळा; साखर कारखाना साईटवर महामार्ग पोलीसांची कार्यशाळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे



ऐन थंडीच्या मोसमामध्ये कडाक्याच्या थंडीत साखर कारखाने सुरू होतात आणि ऊस तोडणी सुरू होते यावेळी आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी ऊस तोड कामगार आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी आपल्या मुला बाळासह उस तोडीला जातात साखर कारखाना सुरू झाला म्हणजे गळीत हंगाम सुरू झाले साखर कारखाना कार्यक्षेत्रा अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग व इतर महामार्गावरून कारखाण्या साठी लगणारा ऊस हा ट्रक ट्रॅक्टर बैलगाडी इतर वाहणाव्दारे साखर कारखाना येथे ऊस वाहतुक जातो सदर ची वाहणे काही कारणास्तव रात्र न दिवस काम केल्याने बंद अवस्थेत पडलेले असतात त्या वाहणाच्या पाठीमागच्या बाजुस रिपलेक्कर लावले नसल्यामुळे इतर वाहन चालकाचा अंदाज चुकतो त्यामुळे सदर ऊसाचे वाहणास पाठीमागुन जोरासी धडक बसुन मोठ्या प्रमाणात अपघात होतो या अपघातात जिवित वित्त हाणी होतो त्यामुळे भविष्यात अशा गोष्टी टाळण्यासाठी ऊस वाहतुक करण्याऱ्या चालक व मालकाने यांनी सदर वाहणा संदर्भात खालील नियमाचे तंतोतंत पालन करावे करणे बंधन कारक आहे . साखर कारखान्या मध्ये ऊस वाहतुक करणारे चालकाकडे मुळे परवाण्याचे लायसन्स सोबत ठेवणे बंधन कारक आहे ट्रॅक्टर चालकाच्या लायसन मध्ये ङ्चत – ढढ हा अधिकार नमुद असणे आवश्यक आहे झेरॉक्स प्रत चालणार नाही. त्याबरोबर ढठछड हा अधिकार नमुद असणे आवश्यक आहे चालकाने दोन पेक्षा जास्त ट्रेलर ओढता कामा नये मोटर वाहणाची लांबी १८ मिटर पेक्षा जास्त असता कामा नये वाहतुक करत असलेल्या ट्रॅक्टर एक साहय्यक असतो त्याचे वय २० पेक्षा कमी नसावे वाहनाच्या पाठीमागील बाजूस रिपलेक्टर चा कापडी बोर्ड लावणे बंधन कारक आहे.

ऊस वाहतूक करणारे वाहनानी सर्विस रोडचा वापर करावा पाठीमागच्या बाजूस लावलेले रिपलेक्टर ठळक अक्षरात लावणे बंधनकारक आहे सदर वाहनांच्या पाठीमागे रात्रीच्या वेळी एक लाल रंगाचा दिवा बसवणे आवश्यक आहे ऊस वाहतूक करणारा ट्रॅक्टरचा वेग १० किमी पेक्षा जास्त असता कामा नये ऊस वाहतूक करणार्या वाहनाची नंबर प्लेट स्पष्ट दिसेल अशा ठिकाणी लावावी ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर मोठ मोठे स्पीकर लावू नये उसाचे वाहन चालवताना चालकाने मोबाईलचा वापर करू नये व कानामध्ये हेडफोन लावू नये बंधनकारक आहे ट्रॅक्टर ट्रेलर यातून ऊस वाहतुकीचा सक्षम प्राधिकरणाकडून घेतलेला ठढज / ठढ वैद्य परवाना असणे गरजेचे बंधनकारक आहे. प्रत्येक वाहनाचे रजिस्ट्रेशन किंवा नोंदणी आवश्यक आहे किंवा विहित केलेल्या स्थूल वजनापेक्षा अधिक माल असता कामा नये सदरील ऊस वाहतूकदार ठेकेदार चालक आणि मालक यांनी अपघात प्रतिबंधक सुरक्षित वाहतूक होणे आपले वरील नियमाचे पालन करावे नाहीतर कारवाईला सामोरे जावे नळदुर्ग धाराशिव जिल्ह्यातील श्री तुळजाभवानी सहकारी साखर कारखाना नळदुर्ग कंचेश्वर सहकारी साखर कारखाना यमगरवाडी विठ्ठल साई सहकारी शेतकरी साखर कारखाना मुरूम भाऊ साहेब बिराजदार सहकारी शेतकरी साखर कारखाना समुद्राळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी शेतकरी साखर कारखाना अरविंद नगर केशेगाव लोकमंगल साखर कारखाना खेड आदि ठिकाणी महामार्गाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक आम्रता पाटाईत हेड कॉन्स्टेबल सतिश पवार हेड कॉन्स्टेबल दिगंबर कुंभार हेड कॉन्स्टेबल उध्दव टोपे सह वाहतुक करणाऱ्या चालकास व मालकास कार्यशाळा घेऊन प्रबोधन केले वरीलवरील नियमाचे तंतोतंत पालन करून हायवे महामार्ग पोलीस सहकार्य करावे असे प्रतिपादन या ठिकाणी अमृता पटाईत यांनी केले आहे .

# माशाळ नगर कराटे क्लासचा चौथा वर्धापन दिन सोहळा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : असोसिएशन ऑफ जीत कुने डो मार्शल आर्ट स्पोर्ट्स सोलापूर संचलित शाखा मासाळे नगर कराटे क्लास चा चौथा वर्धापन दिन सोहळा मंगळवार दि २४ डिसेंबर २०२४ रोजी माशाळे नगर कराटे क्लास वर साजरा करण्यात आला.

याप्रसंगी राज्य क्रीडा मार्गदर्शक गणेश पवार सर , माजी तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव सर, उद्योगपती मा.यशवंत इंगळे साहेब,सोलापूर महापालिका माजी क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप साहेब. ग्रॅन्डमास्टर युवराज गायकवाड सर, वसुंधरा कला महाविद्यालय चे प्राध्यापक डॉ मारुती घटेवाड सर प्राध्यापक डॉ धनंजय मौगले सर, प्राध्यापक बापू राऊत सर, राजलक्ष्मी कन्स्ट्रक्शनचे मालक शिवशंकर पाटणकर साहेब टेक्निकल डायरेक्टर किशोर चंदनशिवे सर, भास्कर देडे सर,सम्राट गायकवाड सर, नागेश कांबळे, संदिप गायकवाड,आदी मान्यवर उपस्थित होते त्यावेळी सोलापूर जिल्हा क्रीडा आदर्श विद्यार्थी पुरस्कार२०२४ कु.शर्वरी विकास गुरव व वैष्णवी चंद्रकांत चव्हाण यांना मान्यतराच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आला तसेच जीत कुने डो मार्शल आर्टचे या वर्षी झालेल्या जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले त्यावेळी जिल्हाप्रमुख तथा माशाळे नगर कराटे क्लासचे प्रमुख मा. अभिजीत गायकवाड सर, सुनील बरगोदीया,निलकंठ स्वामी, लेडीज कोच सत्यभामा गायकवाड, वैभवी दळवी, किमया सपाटे, शिशुपाल चंदनशिवे सर, विश्वजीत गायकवाड, पालक, विद्यार्थी, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते



# स्वा. सावरकर विद्यालयात साने गुरुजी यांची जयंती साजरी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाजाचे, स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय ,कोठुरे येथे थोर विचारवंत साने गुरुजी अर्थातच पांडुरंग सदाशिव साने यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक .संजय निकम हे होते.याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित असलेले सर्व शिक्षक बंधू भगिनी यांच्या हस्ते साने गुरुजी यांचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले . विद्यार्थ्यांच्या वतीने दिव्या कोरडे धैर्य डोंगरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर.शिक्षकांच्या वतीने संजयजी निकम यांनी आपले मनोगत व्यक्त केले ते म्हणाले साने गुरुजी यांनी समाजातील जातीभेद, अस्पृश्यता यासारख्या अनिष्ट रूढी व परंपरा यांना विरोध केला.नाशिकच्या कारागृहामध्ये त्यांनी 'श्यामची आई ' हे पुस्तक लिहिले.ते एक उत्तम शिक्षक होते .यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कु. नंदन दिघे यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक बंधू भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी आर्दीनी परिश्रम घेतले

## आमदार नारायण पाटील यांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

## अवैध वाळू उपशाला पाठिंबा देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

# करमाळा तालुक्यातील अवैध वाळू उपसा बंद करा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी



करमाळा तालुका गेले काही दिवसापासून उजनी नदीतून अवैधरित्या उपसा सुरू आहे. दिवसेंदिवस या वाळू उपशाचे प्रमाण वाढत चालले आहे. अवाळू उपसा तात्काळ बंद करावा अशी मागणी करमाळ्याचे आमदार नारायण पाटील यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

याबाबत नारायण पाटील यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की करमाळा तालुक्यातील उजनी धरणा काठावरील वांगी, चिकलठाण, खाम गाव, येथे वाळू उपसा अवैधरिता सुरू आहे. तक्रारी महसूल विभाग यांच्याकडे येत आहे गेल्या वर्षापासून करमाळा तालुक्यातील सेना नदी भीमा नदी व उजनी पात्रातून अवैधरित्या वाळूचा सुरू आहे त्यामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणावर हानी होत आहे असून तालुक्यातील रस्ते खराब होऊ लागले आहेत तसेच सदर वाळू उपसा हा शासनाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता दिवस रात्र सुरू आहे उजनी धरणातील लाखो ब्रास वाळू माफिया उचलत असल्यामुळे शासनाचा महसूल व रॉयल्टी बुडत आहे पोलिसांची महसुली बघायच्या अधिकारी यांची भूमिका माफी यांना प्रोत्साहन देणारे असल्याची चर्चा आहे अशा तक्रारी माझ्याकडे आले आहेत वाळू माफिया हे असून साम-दाम-दंड सह लोकांना दमकावून आर्थिक तोंड पाणी करून गावागावात दहशतीचे वातावरण करीत आहेत.

> **विधानसभा निवडणूक झाल्यापासून माझ्याकडे वाळू उपसा सुरू असल्याचे अनेक प्रकारचे तक्रारी आले आहे. दोन–तीन वर्षापासून हा वाळू उपसा सुरू आहे अवैधरित्या होणाऱ्या वाळू उपशामुळे शासनाच्या महसूल बुडत आहे. रस्ते खराब होत आहे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे या वाळू उपशाला पाठीशी घालणारे अधिकारी व कर्मचाऱ्यावर देखील कारवाई झाली पाहिजे आणि हा वाळू उपसा बंद झाला पाहिजे तसेच वाळूमाफिया यांच्यावर संघटित गुन्हेगारी अंतर्गत कारवाई करून उपसा बंद झाला नाही तर याबाबत मुख्यमंत्र्याकडे तक्रार करणार आहे.**
>
> **– आमदार नारायण पाटील, करमाळा.**

गावातील सलोखा बिघडत चाललेला आहे. तहसील कार्यालय व पोलीस स्टेशन परिसरात वाळू माफियांचा मोहोळ वावर असल्याची लोक खाजगी बोलत आहेत. कवळीच्या वाळू उपसा करण्यासाठी वाळूमाफे यांनी पाठीशी घालणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांचा देखील कारवाई करण्यात यावी अवैध्य वाळू वाहतुकीमुळे करमाळा तालुक्यातील रस्ते खराब होत असून अपवादाचे प्रमाण वाढत असून त्यामुळे शासनाने रस्ते दुरुस्तीचा खर्च वाढत आहे एका बाजूला उजनी पर्यटनासाठी शासन प्रयत्नशील असताना दुसऱ्या बाजूला पर्यावरणाचा ऱ्हास हे वाळू माफिया करत आहेत.

करमाळा तालुक्यातील उजनी धरणातील अवैधरित्या वाळूचा माफियांवर योग्य कारवाई करावी करमाळा तालुक्यातील गेले दीड दोन वर्षापासून मोठ्या प्रमाणात वैद्य रिक्त वाळू उपसा सुरू आहे व करमाळा तालुक्यातील पूर्व भागात असलेल्या सेना नदीतून तसेच भीमा नदी पात्रात उजनी धरणातून हा वैदरीचा उपसा मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. यामुळे वाळू माफी यांची दहशत या भागात वाढले असून आजूबाजूच्या शेतकऱ्यांना वाळू उपसा करत असताना दम पाटील करणे धमकावणे जीवे मारण्याची धमकी देणे असे प्रकार वारंवार घडत आहेत तसेच वाळू वाळू उपसा करून मागील काही दिवसापासून करमाळा तालुक्यात जीव घेणे हल्ले झाले आहेत मात्र याबाबत पोलिसांनी व महसूल अधिकारी यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतलेले दिसून येत नाही.